# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्यलेखापरीक्षक यांचे कार्यालय

स्व. इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828

जा.क्र.मनपा/मु.ले.प./मा.अ./ ०४ /2024-25 दि.१९/०९ /2024

प्रति,
श्री. हेमंत अनंत सावंत,
दुकान क्रमांक 21,
ओसवाल शॉपिंग सेंटर,
भाईंदर (पु.), ता.जि. ठाणे 401105
मो.क्र.9820080811

विषय :- माहिती अधिकार अधिनियम-2005 चे अंतर्गत माहिती मिळणेबाबत..
संदर्भ :- 1) जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./16/2024, दि.16/09/2024 रोजीचे पत्र.
2) आपलेकडील दि.21/08/2024 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये आपण अपेक्षिलेली मुद्देनिहाय माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुद्दा क्र. | अपेक्षित माहिती तपशिल | संबंधीत मुद्दयाबाबतची पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | 1 | मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रशासकीय कार्यकाल सुरु झाल्यापासून नेमणूक झालेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांची माहिती, नाव, पदनाम, शैक्षणिक पात्रता | सदरची माहिती सामान्य प्रशासन विभागाशी निगडीत आहे. |
| 2 | 2 | प्रशासकीय कारभार सुरु झाल्यापासून मंजुर करण्यात आलेले प्रशासकीय ठराव | सोबत ठरावाची प्रत एकुण प्रती 3 या पत्रासोबत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. |
| | | आदेश व कार्यादेश | निरंक |

वरील माहितीने आपले समाधान न झाल्यास माहिती मिळालेपासुन 30 दिवसांत मा. प्रथम अपिलीय अधिकारी मुख्यलेखापरीक्षक, मिरा भाईंदर महानगरपालिका, चौथा मजला, भाईंदर (प.) यांचेजवळ अपिल करता येईल.

(प्रभाकर म्हात्रे)
जन माहिती अधिकारी तथा
उपमुख्यलेखापरिक्षक
मिरा भाईदर महानगरपालिका

TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401101
सचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./96 /2024

दिनांक :- 16/09/2024

लेखा परिक्षण विभाग
आवक:- 04
दिनांक:- 16/9/2024

प्रति,
मा. जनमाहिती अधिकारी,
सर्व विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार 2005.
प्रशासकीय ठराव, आदेश बाबत माहिती मिळणेबाबत.

संदर्भ :- श्री. हेमंत अनंत सावंत यांचेकडील दि. 21/08/2024 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज. (या कार्यालयास प्राप्त दि.06/09/2024)

महोदय,


उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये अर्जदार यांनी प्रशासकीय कार्यकाळ सुरु झाल्यापासून नेमणूक झालेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांची माहिती, नाव, पदनाम, शैक्षणिक पात्रता व मंजूर करण्यात आलेले प्रशासकीय ठराव, आदेश व कार्यादेशबाबत माहितीची मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यांत येत आहे की, अर्जदार यांच्या पत्रातील मुद्दा क्र. 02 मधील आदेश व कार्यादेशबाबतची माहिती हा अंशतः विषय महानगरपालिकेच्या विवीध विभागांशी निगडीत असल्याने, संदर्भित पत्राची प्रत अर्जदारांस परस्पर माहिती उपलब्ध करुन देणेकामी आपणांकडे वर्ग करण्यात येत आहे. तरी कृपया अर्जदारांस सदर मुद्दयांची माहिती परस्पर उपलब्ध करुन दयावी ही विनंती.

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्वत :-
श्री. हेमंत अनंत सावंत, 19/9/24 call केला
दुकान क्र. 21, ओसवाल शॉपिंग सेंटर, 20/9/24
भाईंदर (पूर्व), जिल्हा-ठाणे, 401105.

# केंद्र शासनाचा माहिती अधिकार-२००५.नमुनापत्र- अ (पहा नियम)



प्रति,

जन माहिती अधिकारी,

सामान्य प्रशासन विभाग,

मिरा-भाईंदर महानगरपालिका.

१)अर्जदाराचे नाव :- हेमंत अनंत सावंत.

२) अर्जदाराचा पत्ता :- संपर्क कार्यालय, दुकान क्रमांक २१, ओसवाल शॉपिंग सेंटर , भाईंदर पूर्व,जिल्हा ठाणे ४०११०५.

भ्रमणध्वनी :- 9820080811

३)आवश्यक असलेली माहिती :- प्रशासकीय ठराव, आदेश बाबत माहिती.

४) माहितीशी संबंधित कालावधी :- ०१-०१-२०२१ पासून आज पर्यंत.

५) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :-

१) मिरा-भाईंदर महानगरपालिके चे प्रशासकीय कार्यकाळ सुरू झाल्यापासून नेमणूक झालेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांची माहिती , नाव, पदनाम, शैक्षणिक पात्रता.

२) प्रशासकीय कारभार सुरू झाल्यापासून मंजूर करण्यात आलेले प्रशासकीय ठराव आणि आदेश, कार्यादेश बाबत माहिती मिळावी.

६) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीस :- व्यक्तीस.

७) टपालाद्वारे असलेल्या बाबतीत :- शीघ्र.

८) त्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन:- न्यायालयीन कामकाज करणे करिता.

९) अर्जदार दारिद्र्यरेषेखाली आहे किंवा कसे :- नाही.

ठिकाण मिरा-भाईंदर

अर्जदाराची सही.

दिनांक : २१-०८-२०२४

H.A. Sawant

श्री हेमंत अनंत सावंत.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्यलेखापरीक्षक यांचे कार्यालय
स्व. इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828

जा.क्र.मनपा/मु.ले.प./मा.अ./ ०४ /2024-25 दि.१९/०९/2024

प्रति,
**श्री. हेमंत अनंत सावंत,**
**दुकान क्रमांक 21,**
**ओसवाल शॉपिंग सेंटर,**
**भाईंदर (पु.), ता.जि. ठाणे 401105**
**मो.क्र.9820080811**

**विषय :- माहिती अधिकार अधिनियम-2005 चे अंतर्गत माहिती मिळणेबाबत..**
**संदर्भ :- 1) जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./16/2024, दि.16/09/2024 रोजीचे पत्र.**
**2) आपलेकडील दि.21/08/2024 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये आपण अपेक्षिलेली मुद्देनिहाय माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुद्दा क्र. | अपेक्षित माहिती तपशिल | संबंधीत मुददयाबाबतची पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | 1 | मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रशासकीय कार्यकाल सुरु झाल्यापासून नेमणूक झालेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांची माहिती, नाव, पदनाम, शैक्षणिक पात्रता | सदरची माहिती सामान्य प्रशासन विभागाशी निगडीत आहे. |
| 2 | 2 | प्रशासकीय कारभार सुरु झाल्यापासून मंजुर करण्यात आलेले प्रशासकीय ठराव | सोबत ठरावाची प्रत एकुण प्रती 3 या पत्रासोबत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. |
| | | आदेश व कार्यादेश | निरंक |

वरील माहितीने आपले समाधान न झाल्यास माहिती मिळालेपासुन 30 दिवसात आ. प्रथम अपिलीय अधिकारी मुख्यलेखापरीक्षक, मिरा भाईंदर महानगरपालिका, चौथा मजला, भाईंदर (प.) यांचेजवळ अपिल करता येईल.

(प्रभाकर म्हात्रे)
**जन माहिती अधिकारी तथा**
**उपमुख्यलेखापरिक्षक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प)

ता.जि.ठाणे 401101

लेखापरीक्षण विभाग

मा.प्रशासकीय सभा दि. 06/09/2024

// प्रशासकीय ठराव //

**प्रकरण क्र.** 304 :- सन 2003-04 ते 2017-18 या वित्तीय वर्षातील लेखापरीक्षण अहवालातील वगळण्यात आलेले प्रलंबित परिच्छेद यांचे अनुपालन स्विकारुन परिच्छेद वगळण्याचे प्रस्तावास मा.प्रशासक तथा मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे अवलोकनार्थ सादर करणेबाबत...

## कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिका सन 2003-04 ते 2017-18 या वित्तीय वर्षातील लेखापरीक्षण अहवालातील प्रलंबित परिच्छेदांबाबत वेळोवेळी शिबिराचे आयोजन करुन विभागाने सादर केलेल्या परिच्छेदांचे अनुपालन स्विकारुन एकुण प्रलंबित परिच्छेद 563 पैकी 77 परिच्छेद अंशतः वगळण्यात आलेले आहेत. सदर परिच्छेद वगळतांना मा. प्रशासक तथा आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे मान्यतेनंतर अंतिम अहवाल दिला जाईल असे संबंधित विभागांना कळविण्यात आले आहे.

सन 2003-04 ते 2017-18 या वित्तीय वर्षातील परिच्छेदांचे अनुपालन स्विकारुन खालीलप्रमाणे एकुण 77 परिच्छेद अंशतः वगळण्यात आलेले आहेत. सदर वगळण्यात आलेल्या परिच्छेदास मा.प्रशासक तथा मा.आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

## सर्वसाधारण सभा प्रशासकीय ठराव क्र. 304 दि. 6/9 /2024

सन 2003-04 ते 2017-18 या वित्तीय वर्षातील आक्षेपांचे अनुपालन स्विकारुन एकुण 77 परिच्छेद अंशतः वगळण्यात आलेले आहेत. खालील विवरणपत्रानुसार वगळण्यात आलेल्या परिच्छेदांचे अवलोकन करण्यात आलेले आहे.

| अ.क्र | विभागाचे नाव | 2013-14 | 2014-15 | 2015-16 | 2016-17 | 2017-18 | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | आस्थापना विभाग | | | | 2.1, 2.3, 2.7, 2.10, 2.12, 2.13, 2.15, 2.17, 2.20, 2.21, 2.22, 2.23 | | 12 |

| अ.क्र | विभागाचे नाव | 2013-14 | 2014-15 | 2015-16 | 2016-17 | 2017-18 | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | मध्यवर्ती भांडार विभाग | | | | 1.1, 1.3 | 19.1 | 03 |
| 3 | पाणी पुरवठा व मलनि:स्सारण विभाग | | 2.7, 2.15 | 11.1 | 11.1, 11.2, 11.3, 11.7, 11.8, 11.10, 11.11, 11.13 | 8.1, 8.2, 8.3, 8.4, 8.5, 8.6, 8.7, 8.8, 8.9, 8.12, 8.13 8.14, 8.20 8.21, 8.23 | 26 |
| 4 | सार्व बांधकाम / मिळकत विभाग | | | | 23.1, 23.3 | 15.9 | 03 |
| 5 | अतिक्रमण व अनधिकृत विभाग | 8.4, 8.8 | 6.3 | | | 5.2, 5.3 | 05 |
| 6 | ग्रंथालय / वाचनालय | | | | 13.1, 13.2 | 14.1, 14.2 14.3 | 05 |
| 7 | वाहन व यांत्रिकी विभाग | | | | 7.1 | 3.1, 3.3, 3.4, 3.5, 3.6 | 06 |
| 8 | जाहिरात विभाग | | | | 3.1, 3.3, 3.4, 3.5, 3.6 | 1.1, 1.3, 1.10, 1.14, 1.15, 1.16, 1.18, 1.23, 1.25 | 14 |
| 9 | माहिती व तंत्रज्ञान विभाग | | | | | 20.1 | 01 |
| 10 | पे ॲण्ड पार्क | | | | | 16.2, 16.3 | 02 |
| | एकुण | | | | | | 77 |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1अ) व (1ब) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसी ओ/2020/प्र.क्र.71(भाग-2) नवि-14 दि. 26/08/2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी संजय श्रीपतराव काटकर, प्रशासक तथा आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. सर्वसाधारण सभेच्या अधिकाराचा वापर करुन लेखापरीक्षण विभागाने अनुपालन स्विकारलेल्या वरील तक्त्यानुसार 77 परिच्छेद वगळण्याचे प्रस्तावास मंजुरी देण्यात येत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.))
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे 401101

लेखापरिक्षण विभाग

**मा. प्रशासकीय सभा दि.** ०३/०३/२०२४

प्रकरण क्र. :- ५५६ सन 2018-19, 2019-20 व 2020-21, 2021-2022 या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखापरिक्षण अहवाल मा. प्रशासक तथा मा. आयुक्त यांना सादर करणेबाबत..

## कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे वित्तीय वर्ष सन 2018-19, 2019-20 व 2020-21, 2021-2022 या कालावधीतील लेखापरिक्षण विभागाकडून वार्षिक लेखापरिक्षण पूर्ण झालेले आहे. सदर लेखापरिक्षण अहवालाचे पूर्न:विलोकन करुन अंतिमीकरण करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 106(3) अन्वये मुख्यलेखापरिक्षकांनी लेखापरिक्षण अहवाल मा. स्थायी समितीकडे मान्यतेकरिता सादर करणे आवश्यक आहे. तथापि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 "अ" च्या (1अ) व (1ब) मधील तरतुदीनुसार दि.27/08/2022 रोजी मुदत संपत असल्याने शासन आदेश क्र.एम.सी.ओ2020/प्र.क्र.71 (भाग-2)नवि-14, दि.26/08/2022 अन्वये मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची "प्रशासक" म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

त्यानुसार वित्तीय वर्ष सन 2018-19, 2019-20 व 2020-21, 2021-2022 या कालावधीमधील लेखापरिक्षण अहवालास मा. प्रशासक तथा आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या मान्यतेकरिता सादर करण्यात येत आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.** ५५६ **दि.** ०३/०३/२०२४

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन 2018-19, 2019-20 व 2020-21, 2021-2022 या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेखापरिक्षण अहवाल मंजुर प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1अ) व (1ब) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक क्र.एम.सी.ओ.2020/ प्र.क्र.71 (भाग-2) नवि-14, दि.26/08/2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) प्रशासक तथा आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. स्थायी समिती सभेच्या अधिकाराचा वापर करुन लेखापरिक्षण विभागाने सादर केलेल्या वित्तीय वर्ष सन 2018-19, 2019-20 व 2020-21, 2021-2022 या कालावधीच्या वार्षिक लेखापरिक्षण अहवालास मान्यता देण्यात येत आहे.

मुख्यलेखापरिक्षकांनी सन 2018-19, 2019-20 व 2020-21, 2021-2022 या वार्षिक लेखापरिक्षण अहवालात निर्देशनास आणून दिलेल्या लेखा आक्षेपांबाबत अति. आयुक्त (1) व (2), शहर अभियंता व सर्व विभागप्रमुख यांनी संबंधीत विभागाकडून आक्षेपांचे अनुपालन करुन घेवून मुख्यलेखापरिक्षक यांस चार महिन्यात सादर करावे.

साक्षांकित प्रत

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर)
प्रशासक तथा आयुक्त (भा.प्र.से.)
मिरा भाईंदर महानगरपालिका